दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### सुविचार

निखळ मैत्री म्हणजे कोणतेही स्वार्थाचे ओझे न बाळगता, सुख-दुःखात शांतपणे सोबत उभी राहणारी नाती; जी बोलण्यापेक्षा समजून घेते आणि अंतर असूनही मनांनी नेहमीच जवळ राहते.

### शेवटची टर्म ठरायला नको

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांनी निवडणुकीच्या प्रचारसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख केला. मंत्री गिरीश महाजन यांनी सुहास बाबर यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. सुहास बाबर यांनी मुख्यमंत्र्यांचा एकेरी उल्लेख करणं चुकीचं आहे, तसेच सुहास बाबर यांच्या भाषेवरुन एकनाथ शिंदे यांनी त्यांना समज द्यावी. तसेच आपली पहिली टर्म आहे, ती शेवटची ठरु नये, असादेखील इशारा गिरीश महाजन यांनी सुहास बाबर यांना दिला आहे.

## सारांश वृत्त

### नेपाळ आणि भारत दरम्यान थेट बस

**नवी दिल्ली :** दिकाठमांडू हिमालयीन देशातील प्रसिद्ध हिंदू आणि बौद्ध तीर्थक्षेत्र मुक्तीनाथ येथे जाणाऱ्या यात्रेकरूंना सुविधा देण्यासाठी नेपाळच्या बेनी नगरपालिकेला भारताची राजधानी नवी दिल्लीशी जोडणारी थेट बस सेवा बुधवारी सुरू करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बेनी हे गंडकी प्रांतातील मुस्तांग जिल्ह्यात असलेल्या मुक्तीनाथ या प्राचीन विष्णू मंदिराचे प्रवेशद्वार आहे. 'मुक्तीचा देव' म्हणून ओळखले जाणारे मुक्तीनाथ मंदिर हिंदू आणि बौद्ध दोघांसाठीही पवित्र आहे, जे अनुक्रमे हिंदू देवता विष्णू आणि बौद्ध देवता अवलोकितेश्वर यांचे निवासस्थान म्हणून त्याची पूजा करतात.

### पाकमधील पंजाबात वसंत सणाची सुट्टी

**लाहोर :** पाकिस्तानच्या पंजाब सरकारने दोन दशकांनंतर साजरा होणाऱ्या बसंत सणाच्या उत्सवासाठी ६ आणि ७ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे. मरियम नवाज यांच्या नेतृत्वाखालील पंजाब सरकारने या संदर्भात एक अधिसूचना जारी केली. "पंजाबमध्ये ५ फेब्रुवारी रोजी काश्मीर दिनासह एक लांब वीकेंड असेल, ६ तारखेला प्रांतीय बसंत सुट्टी असेल, त्यानंतर शनिवार आणि रविवार असेल," असे मरियम नवाज यांनी सांगितले.


### यवतमाळमध्ये २१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**नागपूर :** पूर्व महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यात जानेवारीमध्ये २१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे, असे एका कार्यकर्त्याने बुधवारी सांगितले आणि सरकार कृषी संकटाला तोंड देण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला. वसंतराव नाईक शेटी स्वावलंबन मिशनचे माजी अध्यक्ष किशोर तिवारी यांनी जिल्ह्यात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची अधिकृत यादी शेअर केली.

## गॅस टँकर अपघाताने मुंबई-पुणे मार्ग ठप्प
# टोलवसुलीवर प्रवाशांचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर केमिकल वाहून नेणाऱ्या टँकरच्या अपघातामुळे गेल्या २८ तासांपासून वाहतूक ठप्प झाली असून त्याचा मोठा फटका जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर बसला आहे. खोपोली टोल नाक्याजवळ प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, अडचणीत सापडलेल्या प्रवाशांकडून टोल वसुली सुरूच असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका पहाटेच्या सुमारास प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसला. काही कॅन्सरग्रस्त तसेच गंभीर आजारी रुग्ण या कोंडीत अडकले असल्याची माहिती आहे. तासनतास अडकलेल्या प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची किंवा मूलभूत सुविधांची कोणतीही व्यवस्था करण्यात न आल्याची तक्रार आहे. दुसरीकडे, टोल कर्मचाऱ्यांकडून वाहतूक कोंडीची माहिती दिली जात नसल्याने प्रवाशांच्या संतापात अधिकच भर पडत आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ३ फेब्रुवारी सायंकाळी घडलेल्या गॅस टँकर अपघातानंतर गेल्या २८ तासांपेक्षा जास्त काळ भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या मार्गावर ३० ते ४० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून हजारो प्रवासी अडकून पडले आहेत. दीर्घकाळ सुरू असलेल्या कोंडीमुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मंगळवारी (दि. ३ फेब्रुवारी) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारा प्रोपलिन वायू वाहून नेणारा टँकर आडोशी बोगद्याजवळील तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाला. अपघातानंतर टँकरमधून अत्यंत ज्वलनशील प्रोपलिन गॅसची गळती सुरू झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आली होती. पलटी झालेल्या टँकरमधील गॅस दुसऱ्या रिकाम्या टँकरमध्ये काढून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर टँकर सरळ करून रस्त्याच्या कडेला हटवण्यात येणार आहे. प्रोपलिन वायू अत्यंत धोकादायक असल्याने कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी सर्व खबरदारीचे उपाय राबवण्यात येत आहेत.

या अपघाताचा परिणाम द्रुतगती मार्गासह जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरही झाला आहे. दोन्ही मार्गांवर २० ते २५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू आहे.

या वाहतूक कोंडीचा फटका महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांनाही बसला आहे. परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील विविध विभागांमधील एकूण १३९ बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. यामध्ये ७३ ई-शिवनेरी व ६६ इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे. तसेच, या एक्सप्रेस वेवर महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एकूण १६३ वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील ४६, सोलापूर विभागातील ३६, पुणे विभागातील २०, सांगली विभागातील १८, कोल्हापूर विभागातील १३, पालघर विभागातील १२, ठाणे विभागातील ११ आणि मुंबई विभागातील ७ वाहनांचा समावेश आहे.

# सुनेत्रा पवारांकडेच राष्ट्रवादीचे अध्यक्षपद?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत असून, सुनेत्रा पवार यांची पक्षातील ताकद आणखी वाढण्याची शक्यता आहे. पती आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नुकत्याच झालेल्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. आता त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर असल्याची चर्चा आहे.

गेल्या आठवड्यात अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. या धक्कादायक घटनेनंतर पक्षात नेतृत्वाबाबत चर्चा रंगल्या होत्या. सुरुवातीला प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती होईल, अशी अटकळ बांधली जात होती. मात्र पटेल यांनी स्वतः या चर्चांना पूर्णविराम देत, आपण अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. पक्षातील बहुसंख्य नेत्यांना सुनेत्रा पवार यांनीच हे पद भूषवावे, अशी भावना असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र सरकारनेही सुनेत्रा पवार यांची जबाबदारी वाढवली आहे. त्यांना पुणे आणि बीड जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले असून, हीच जबाबदारी यापूर्वी अजित पवार यांच्याकडे होती. सरकारने त्यांच्यावरील जबाबदारी वाढवली आहे.

प्रफुल्ल पटेल म्हणाले, "आम्हाला सुनेत्रा पवार अध्यक्ष व्हाव्यात असे वाटते. पक्ष मजबूत करण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र काम करू. हीच अजित पवारांना खरी श्रद्धांजली ठरेल."

# डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यापासून पंकजा मुंडेंना रोखले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लातूर :** भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांना लातूर जिल्ह्यातील जानवळ गावातील ग्रामस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यापासून रोखल्याची घटना समोर आली आहे.

सध्या राजकीय नेत्यांकडून जिल्हा परिषद निवडणुकीसाठीचा प्रचार जोरात सुरू आहे. याच प्रचाराच्या निमित्ताने भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी लातूरमध्ये आलेल्या पंकजा मुंडेंना लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी लातूरमधील जानवळ गावात आलेल्या पंकजा मुंडे यांनी सभेपूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला. शिवाय सभेनंतर जेव्हा मुंडे या बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी गेल्या तेव्हा स्थानिकांनी त्यांना रोखले. यावेळी ग्रामस्थांचा वाढता विरोध आणि संताप पाहता मुंडेंनी अभिवादन न करताच घटनास्थळावरून काढता पाय घेतला.


दरम्यान, पंकजा मुंडे यांच्याआधी भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांना देखील नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. नाशिक येथे प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात महाजन यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने महिला वन अधिकाऱ्याने जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. यानंतर अनेक ठिकाणी महाजन यांचा निषेध करण्यात आला होता. त्यानंतर मंत्री महाजन यांनी आपल्याकडून अनवधानाने बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव राहिल्याचे सांगत दिलगिरी व्यक्त केली होती.

## महा-टीईटीचा धक्कादायक निकाल!
# ३ लाख ९६ हजारांहून अधिक गुरुजी नापास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महा-टीईटीचा २०२५ चा निकाल जाहीर होताच राज्यातील शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शिक्षक होण्याचे स्वप्न घेऊन बसलेल्या लाखो उमेदवारांसाठी ही परीक्षा निर्णायक मानली जाते. मात्र यंदाचा निकाल पाहता पात्र शिक्षकांची टंचाई, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि परीक्षेच्या स्वरूपावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्य परीक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, महा-टीईटी २०२५ साठी एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवार प्रत्यक्ष परीक्षेला बसले, तर जवळपास २९



हजार उमेदवार गैरहजर राहिले. निकालात मात्र केवळ ५० हजार ३६९ उमेदवार उत्तीर्ण ठरले. याचा अर्थ सुमारे ३ लाख ९६ हजार ३२५ उमेदवारांना अपयशाला सामोरे जावे लागले असून एकूण उत्तीर्णतेचे प्रमाण अवघे ११.२८ टक्के इतकेच आहे.

महा-टीईटी ही परीक्षा राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमध्ये शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी अनिवार्य आहे. २०१० पासून केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही पात्रता परीक्षा घेतली जाते. यापूर्वीही काही वर्षांत निकाल कमी टक्केवारीत लागले होते, मात्र यंदाचा निकाल गेल्या अनेक वर्षांतील सर्वांत कमी असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे भविष्यात शिक्षक भरती प्रक्रियेवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

माध्यमनिहाय निकाल पाहिल्यास मोठी विषमता समोर आली आहे. कन्नड माध्यमाचा निकाल तुलनेने समाधानकारक असून तो १५ टक्क्यांहून अधिक आहे. मराठी, हिंदी आणि तेलुगू माध्यमांचा निकाल सरासरीच्या आसपास राहिला आहे. मात्र उर्दू, इंग्रजी आणि विशेषतः गुजराती माध्यमाचा निकाल अत्यंत कमी टक्केवारीत लागल्याने त्या माध्यमांतील प्रशिक्षण व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

इयत्ता पहिली ते पाचवीसाठी असलेल्या पेपर १ मध्ये दोन लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती. या पेपरमध्ये उपस्थित उमेदवारांपैकी केवळ ११.४७ टक्के उमेदवार यशस्वी ठरले. इयत्ता सहावी ते आठवीसाठीच्या पेपर २ चा निकालही फारसा वेगळा नसून तो ११.१३ टक्क्यांवरच मर्यादित राहिला आहे.

या निकालानंतर शिक्षक संघटना आणि शिक्षणतज्ज्ञांकडून विविध प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. बीएड, डीएड महाविद्यालयांमधील प्रशिक्षणाची गुणवत्ता, अभ्यासक्रम व प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्नांची पातळी यामध्ये मोठी दरी असल्याचा आरोप काही तज्ज्ञांनी केला आहे. तर उमेदवारांकडून परीक्षेचा अवघडपणा आणि प्रश्नांची भाषा समजण्यास कठीण असल्याच्या तक्रारी व्यक्त होत आहेत.

एकीकडे शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासत असताना, दुसरीकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर उमेदवार नापास होणे ही बाब राज्याच्या शिक्षण व्यवस्थेसाठी चिंताजनक मानली जात आहे. शासन या निकालाचा आढावा घेऊन प्रशिक्षण व्यवस्था, अभ्यासक्रम आणि परीक्षेच्या स्वरूपात बदल करणार का, याकडे संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी संस्कृतीचे प्रमुख वाहक
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हरिद्वार :** श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक म्हणून कार्य केले. म्हणूनच आज नव्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीची महानता टिकून आहे. त्यांच्या समाधी मंदिरामुळे भावी पिढ्यांसाठी एका प्रेरणास्थळ निर्माण झाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

उत्तराखंड - हरिद्वार येथील श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात श्रीविग्रह मूर्ती स्थापना समारंभात मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. या सोहळ्यास माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, प.पू. जुनापीठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरीजी, राम जन्मभूमी मंदिर न्यासाचे स्वामी गोविंददेव गिरीजी, पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया, उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ल, स्वामी अखिलेश्वरानंदजी, स्वामी हरिचेतनानंदजी, स्वामी ललितानंद गिरीजी, महंत देवानंदसरस्वती, विनय रोहिला, प्रदीप बत्रा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय संस्कृतीतील संत परंपरा समाजाला जोडण्याचे, एकसंध ठेवण्याचे कार्य करते. तेच कार्य स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी भारत माता मंदिर स्थापनेतून सुरु केले. याशिवाय त्यांनी भारतीय सनातन संस्कृतीच्या जगभरात विखुरलेल्या प्रवाहांना एकत्रित आणण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यांनी आपले सर्व आयुष्य मानवतेच्या कार्यासाठी वाहिले. जिथे कुठे आपत्ती, संकट आले, त्या ठिकाणी स्वामीजी धावून गेले. तिथे त्यांनी सगळे भेद बाजूला सारून मदतकार्य केले. यामाध्यमातून सनातन संस्कृतीची ओळख निर्माण केली. या प्रवासात त्यांनी कित्येकदा अनेक पदांचाही त्याग केला आणि आपल्या वैश्विक कार्याला पुढे नेण्यात धन्यता मानली. त्यामुळेच त्यांना जगभर अद्भुत व्यक्तित्व म्हणून सन्मान मिळाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आज जगभरातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. पण भारतीय सनातन संस्कृती आजही टिकून राहीली आहे असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सनातन विचार भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगणारे आणि सर्वात प्राचीन असे आहेत. आता सरस्वती संस्कृतीच्या उत्खननातूनही या विचारांच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे विज्ञान आणि इतिहास या दोन्ही कसोट्यांवर भारतीय जीवन पद्धती, सनातन संस्कृती समृद्ध असल्याचे सिद्ध झाले. ही संस्कृती टिकवण्यात स्वामी सत्यमित्रानंदजी यांच्यासारख्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात सांस्कृतिक पुनरोत्थानाच्या कार्याला मोठी गती मिळाली. आता भावी पिढ्याही या सनातन संस्कृतीशी स्वतःला जोडून घेऊ लागली असून, त्यांनाही संस्कृतीचा अभिमान वाटू लागला आहे, असेही ते म्हणाले.

### तुर्कीच्या विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**कोलकाता :** नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी दुपारी तुर्की एअरलाइन्सच्या आंतरराष्ट्रीय उड्डाणाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. २३६ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या वाइड-बॉडी विमानाच्या उजव्या इंजिनमध्ये संशयास्पद बिघाड आढळल्यानंतर आणि आगीच्या ज्वाळा दिसल्याची माहिती वैमानिकांनी दिल्याने आपत्कालीन स्थिती जाहीर करण्यात आली. हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाने तात्काळ आपत्कालीन प्रोटोकॉल सक्रिय करून धावपट्टीवर अग्निशमन व बचाव पथके तैनात केली. विमान सुरक्षितपणे उतरले. विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, अशी माहिती विमानतळ अधिकाऱ्यांनी दिली.

# अजित पवारांच्या अस्थींचे बीडमध्ये गोदावरीत विसर्जन; कार्यकर्ते भावूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर देशभरात त्यांच्या अस्थींचे विसर्जन विविध ठिकाणी करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांचा एक अस्थिकलश बुधवारी बीड जिल्ह्यात आणण्यात आला. या कलशातील अस्थी गोदावरी नदीत विधीपूर्वक विसर्जित करण्यात आल्या.

अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना ज्या मर्सिडीज कारमधून प्रवास करत असत, त्याच कारमधून बुधवारी त्यांचा अस्थिकलश गोदावरी नदीच्या दिशेने नेण्यात आला. सकाळी दहा वाजता राष्ट्रवादी



काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्ते आणि नागरिकांसाठी अस्थिदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी आमदार धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके यांच्यासह माजी आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी अस्थिकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.

त्यानंतर अस्थिकलश शनी मंदिर परिसरातील गोदावरी नदीकाठी नेण्यात आला. येथे धार्मिक विधी पार पाडून अजित पवारांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले. धनंजय मुंडे सभागृहात दाखल होताच, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला एक ऑडिओ लावण्यात आला. या प्रसंगी उपस्थित सर्वच मान्यवर आणि कार्यकर्ते भावूक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती येथे येत असताना विमान अपघातात मृत्यू झाला होता. धावपट्टीवर उतरत असतानाच विमान जमिनीवर कोसळून स्फोट झाला होता. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर २९ जानेवारी रोजी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतला आढावा
# नदीजोड प्रकल्पांतील कामांना मिळणार गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पांतील कामांना गती देण्याच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे- पाटील यांनी सविस्तर आढावा घेतला.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प तसेच कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा नदी खोऱ्यात वळविण्यासाठी सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला.



सह्याद्री अतिथीगृह येथे नदीजोड प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकणातील जलसमृद्ध खोऱ्यांमधील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नाशिक व मराठवाडा भागातील पाणीटंचाई दूर करणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले की, पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील अतिरिक्त जमिनी पर्यावरणपूरक व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून महामंडळाचे उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यात येणार आहेत. धरण क्षेत्रालगतच्या या जमिनी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर विकसित व व्यवस्थापित करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. पुणे व सोलापूर जिल्ह्यांत कार्यवाही सुरू झाली असून या धोरणानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

'नाबार्ड'च्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या सिंचन प्रकल्पांसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित असून त्यापैकी साडेआठ हजार कोटी रुपये जलसंपदा विभागास प्राप्त झाले आहेत. या निधीतून विविध सिंचन प्रकल्पांची कामे सुरू आहेत. सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी साडेसहा हजार कोटी रुपयांचे वितरण करण्याबाबत वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे तसेच कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात पाणी आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

जलसंपदा विभागाने तयार केलेल्या फ्लोटिंग सोलर पॉवर जनरेशन पॉलिसीच्या आराखड्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. हा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादर करण्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री विखे- पाटील यांनी दिले. तसेच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत पाटबंधारे नियम, १९७६ मध्ये प्रस्तावित बदल करण्याबाबतच्या तरतुदी मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येणार असून, त्यासंदर्भातही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध सिंचन प्रकल्प, विकासकामे तसेच नदीजोड प्रकल्पांसाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती सादर करण्यात आली.

# लाडक्या बहिणींना दिलासा तीन महिन्यांचा हप्ता एकत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेमुळे रखडलेला नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचा एकत्रित ४,५०० रुपयांचा हप्ता पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा केला जाणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाने दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महिलांना दरमहा १,५०० रुपयांची थेट आर्थिक मदत मिळत आहे. या योजनेचा राजकीय लाभ महायुती सरकारला निवडणुकीत झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. मात्र ई-केवायसी पूर्ण न झाल्याने अनेक महिलांचे हप्ते थांबले होते. यामुळे अनेक ठिकाणी महिलांनी नाराजी व्यक्त करत थेट संबंधित कार्यालयांत धाव घेतली, तर काही ठिकाणी आंदोलनही झाले. या पार्श्वभूमीवर महिला व बालविकास विभागाने लाभार्थी महिलांच्या घरी जाऊन चौकशी करण्याचे आदेश दिले होते. नियम व अटी डावलून सादर झालेल्या अर्जांची सध्या पडताळणी सुरू आहे.

या निर्णयानुसार, ज्यांचे नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारीचे हप्ते रखडले होते, त्यांच्या खात्यात थेट ४,५०० रुपये जमा होणार आहेत.

काही महिलांना यापूर्वीच दोन महिन्यांचे हप्ते मिळाले असून, त्यांना जानेवारी महिन्याचा एकच १,५०० रुपयांचा हप्ता देण्यात येणार आहे.

## संपादकीय

# बदलत्या समीकरणांचा व्यापार करार



**भारत–अमेरिका व्यापार कराराने जागतिक अर्थकारणातील बदलते प्रवाह अधोरेखित केले आहेत. टैरिफ कपात, गुंतवणूकदारांचा उत्साह आणि भू-राजकीय संकेत यामधून नव्या संधी दिसतात; मात्र कराराच्या अटी, देशांतर्गत परिणाम आणि दीर्घकालीन धोरणात्मक किंमत यांचे शांत विश्लेषण आवश्यक ठरते.**

गेल्या काही दिवसांत भारताच्या परराष्ट्र धोरणात आणि व्यापारविषयक भूमिकेत जे घडले आहे, ते नेहमीच्या गतीपेक्षा वेगळे आहे. भारत–अमेरिका व्यापार कराराने केवळ टैरिफ प्रश्न सुटलेला नाही, तर बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताने कोणती दिशा स्वीकारली आहे, याचेही संकेत मिळतात. जागतिक राजकारणात कधी कधी वर्षे उलटूनही फारसे काही बदलत नाही आणि कधी आठवड्यांत दशकांचे परिणाम घडतात. भारताच्या बाबतीत सध्या दुसरी परिस्थिती दिसते. युरोपियन युनियनशी दीर्घकाळ रेंगाळलेल्या व्यापार वाटाघाटी पूर्ण होत असतानाच, नवी दिल्ली आणि वॉशिंग्टन यांच्यातील व्यापार करारावर शिक्कामोर्तब झाले. दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये झालेल्या दूरध्वनी संभाषणानंतर हा करार अधिकृत झाला. गेल्या काही महिन्यांतील तणाव, टैरिफ धमक्या आणि अनिश्चिततेनंतर हा करार दोन्ही देशांच्या संबंधांना नव्या टप्प्यावर नेणारा ठरतो. अमेरिकेने या कराराअंतर्गत भारतीय निर्यातीवरील कर दर थेट ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केली आहे. ही कपात तात्काळ लागू होणार असल्याने तिचा परिणाम लवकरच दिसेल. यामुळे भारताला व्हिएतनाम, बांगलादेश, इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आणि चीनसारख्या निर्यातदार प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत अधिक अनुकूल स्थिती मिळते. विशेषतः वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्मिती आणि काही कृषी-आधारित उत्पादनांना याचा थेट फायदा होण्याची शक्यता आहे. अमेरिकेची भूमिका केवळ व्यापारापुरती मर्यादित नाही. चीनविरोधातील जागतिक रणनीती, पुरवठा साखळ्यांचे पुनर्संयोजन आणि 'चीन प्लस वन' धोरण यामध्ये भारताला महत्त्वाचा भागीदार मानले जात आहे, हे या निर्णयातून स्पष्ट होते. अमेरिकेने भारताशी करार करून आशियातील आर्थिक आणि सामरिक समीकरणात एक स्पष्ट संदेश दिला आहे. भारताची प्रतिक्रिया अपेक्षेप्रमाणे सकारात्मक आहे. सरकारकडून हा करार भारताच्या अर्थव्यवस्थेला जागतिक बाजाराशी अधिक घट्ट जोडणारा असल्याचे सांगितले जात आहे. गुंतवणूकदारांनीही या घोषणेचे स्वागत केले. शेअर बाजारात उसळी दिसली, रुपया काहीसा मजबूत झाला आणि परकीय गुंतवणुकीबाबतचा आशावाद वाढला. थेट परकीय गुंतवणूक आणि पोर्टफोलिओ गुंतवणूक या दोन्ही आघाड्यांवर या करारामुळे विश्वासाचे वातावरण निर्माण झाले, असे चित्र आहे. ऊर्जा व्यापार हा या करारातील एक महत्त्वाचा, पण संवेदनशील मुद्दा आहे. रशियाकडून होणारी तेल आयात कमी करत भारताने अमेरिकेकडून कच्च्या तेलाची आयात वाढवली आहे. यामागे केवळ आर्थिक गणित नाही, तर भू-राजकीय वास्तवही आहे. मात्र, या बदलाची किंमत काय, दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेवर त्याचा काय परिणाम होईल, याबाबत सविस्तर चर्चा अद्याप झालेली नाही. विरोधकांचा आक्षेप याच ठिकाणी पुढे येतो. त्यांच्या मते, हा करार घाईघाईत झालेला असून त्याच्या अटी अजूनही पूर्णपणे स्पष्ट नाहीत. टैरिफ कपातीच्या बदल्यात भारताने नेमक्या कोणत्या सवलती दिल्या, देशांतर्गत उद्योगांवर त्याचा काय परिणाम होईल आणि आत्मनिर्भरतेच्या घोषणेशी हा करार कितपत सुसंगत आहे, हे प्रश्न ते उपस्थित करत आहेत. काही क्षेत्रांतील लघुउद्योगांना आणि शेतकऱ्यांना दीर्घकालीन फटका बसू शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. तरीही, एक गोष्ट स्पष्ट आहे. नरेंद्र मोदी सरकारने केलेल्या सलग व्यापार करारांमधून संरक्षणवादाच्या भिंती हळूहळू कोसळत असल्याचे संकेत मिळतात. भारत जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये अधिक ठामपणे सहभागी होण्याचा प्रयत्न करत आहे. हा बदल स्वागतार्ह असला, तरी तो पुरेसा नाही. मुक्त व्यापाराचा फायदा घ्यायचा असेल, तर देशांतर्गत सुधारणा, कामगार कायदे, कररचना आणि उत्पादनक्षमता वाढवणे या आघाड्यांवरही तितकाच जोर द्यावा लागेल. या करारामुळे तात्पुरता उत्साह निर्माण झाला असला, तरी आत्मसंतुष्ट होण्याचे कारण नाही. भारताने इतर बहुपक्षीय आणि प्रादेशिक व्यापार करारांबाबतही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. जागतिक अर्थव्यवस्था अनिश्चिततेत असताना, संधी आणि धोके दोन्ही समोर आहेत. भारत–अमेरिका व्यापार करार हा त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे; पण अंतिम यश त्याच्या अंमलबजावणीवर आणि पुढील धोरणात्मक निर्णयांवर अवलंबून असेल.

# क्रिकेट सामन्याने लावला शेजारधर्माचा कस

**» क्रिकेटसारख्या लोकप्रिय खेळावर जेव्हा शेजारी देशांतील राजकीय तणावांचे सावट पडते, तेव्हा स्पर्धा मैदानापुरती राहत नाही. टी२० विश्वचषकाच्या निमित्ताने उभे राहिलेले वाद हे खेळ, कूटनीती आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची मर्यादा यांचा कस पाहणारे ठरत आहेत.**






टी२० विश्वचषक हा केवळ खेळाचा उत्सव नसतो; तो जागतिक क्रिकेट व्यवस्थेचा आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक आरसा असतो. याच स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारताच्या शेजारी देशांशी असलेले तणाव पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आले आहेत. भारतात होणाऱ्या या स्पर्धेत काही संघांची नाराजी, अस्वस्थता आणि अटी यांमुळे 'खेळाच्या राजकारणाचे' जुने प्रश्न नव्याने उफाळून आले आहेत. भारत–पाकिस्तान संबंध हा या वादाचा मध्यबिंदू आहे. क्रिकेटमध्ये या दोन देशांचा सामना म्हणजे प्रेक्षकांसाठी उत्सुकतेचा कळस, तर आयोजकांसाठी महसुलाचा कणा. मात्र राजकीय वास्तवामुळे हा सामना नेहमीच अनिश्चिततेच्या सावलीत राहिला आहे. सध्याच्या परिस्थितीतही पाकिस्तानकडून सहभागाबाबत अटी घालणे, तर भारताकडून सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित करणे, हे अपेक्षितच आहे. प्रश्न इतकाच की, ही तणावपूर्ण भूमिका आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या आत्म्याशी सुसंगत आहे का? आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद ही संस्था राजकारणापासून अलिप्त राहण्याचा दावा करते. प्रत्यक्षात मात्र ती सदस्य देशांच्या राजकीय दबावांपासून पूर्णपणे मुक्त राहू शकलेली नाही, हे वारंवार सिद्ध झाले आहे. खेळाचे वेळापत्रक, स्थळनिवड आणि संघांच्या सहभागाबाबत घेतले जाणारे निर्णय हे अनेकदा क्रिकेटपेक्षा कूटनीतीने ठरवले जातात. टी२० विश्वचषकातही हेच चित्र दिसते. भारतासाठी ही स्पर्धा प्रतिष्ठेची बाब आहे. मोठी बाजारपेठ, प्रचंड प्रेक्षकवर्ग आणि आर्थिक क्षमता यांमुळे जागतिक क्रिकेटचा भार मोठ्या प्रमाणावर भारताच्या खांद्यावर आहे. त्यामुळे भारतात स्पर्धा होणे हे स्वाभाविक मानले जाते. मात्र शेजारी देशांकडून सुरक्षेच्या नावाखाली व्यक्त होणाऱ्या शंका, किंवा राजकीय कारणांनी खेळ टाळण्याचे प्रयत्न, यामुळे भारताच्या यजमानपदावरच अप्रत्यक्ष प्रश्नचिन्ह लावले जाते. दुसरीकडे, काही शेजारी देशांची भूमिका पूर्णपणे दुर्लक्षितही करता येत नाही. त्यांच्या अंतर्गत राजकारणात भारतविरोधी भूमिका लोकप्रिय ठरते. क्रिकेटसारख्या मंचाचा वापर करून ती भूमिका अधिक ठळक केली जाते. याचा फटका मात्र खेळाडूंना आणि प्रेक्षकांना बसतो. खेळाडू राजकीय संघर्षाचे अनिच्छुक प्रतिनिधी बनतात, तर प्रेक्षकांना अपेक्षित असलेला खेळ पाहण्याचा हक्क गमवावा लागतो. या वादाचा आर्थिक पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. भारत–पाकिस्तान सामना न झाल्यास प्रसारण हक्क, जाहिरात महसूल आणि प्रायोजकांचे गणित कोलमडते. जागतिक क्रिकेटची अर्थव्यवस्था अशा उच्च-प्रोफाइल सामन्यांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामुळे राजकीय कारणांनी खेळ टाळणे हा निर्णय केवळ भावनिक नाही, तर आर्थिकदृष्ट्याही परिणामकारक ठरतो. या सगळ्यात क्रिकेटच्या मूळ उद्देशाचा विसर पडतो. खेळ हा संघर्ष कमी करण्याचे, संवादाचे आणि कधी कधी राजकारणापलीकडे जाण्याचे माध्यम ठरू शकतो, असा अनुभव जगाने अनेकदा घेतला आहे. भारत–पाकिस्तान क्रिकेटनेही काही काळासाठी का होईना, तणाव कमी झाल्याचे क्षण दिले आहेत. मात्र सध्याच्या वातावरणात क्रिकेटलाच संघर्षाचे साधन बनवले जात असल्याचे चित्र आहे. भारताने या परिस्थितीकडे संयमाने पाहणे आवश्यक आहे. यजमान देश म्हणून नियम, सुरक्षितता आणि स्पर्धेची शुचिता यांवर ठाम राहणे महत्त्वाचे आहे. त्याच वेळी, आंतरराष्ट्रीय संस्थांनीही दुहेरी निकष टाळून सर्वांसाठी समान नियम लागू केले पाहिजेत. अन्यथा, प्रत्येक मोठी स्पर्धा ही राजकीय कुरघोडीचे मैदान बनण्याचा धोका कायम राहील. शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचे उत्तर क्रिकेटमध्ये नाही, हे वास्तव असले तरी क्रिकेटमुळे ते अधिक बिघडू नयेत, ही किमान अपेक्षा आहे. टी२० विश्वचषक हा खेळाचा उत्सव राहतो की राजकीय तणावांचा आणखी एक अध्याय बनतो, हे येत्या काळात स्पष्ट होईल. मात्र खेळावर प्रेम करणाऱ्यांसाठी ही परीक्षा केवळ संघांची नाही, तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट व्यवस्थेच्या प्रगल्भतेची आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी आमदार शंकर जगताप यांची 'मॅरेथॉन बैठक'

## रस्ते, पाणीपुरवठा, हॉकर्स झोनसह पब्लिक अमेनिटीजवर ठोस निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि नव्या विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी आमदार शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासोबत मॅरेथॉन बैठक घेतली. या बैठकीत किवळे, रावेत, मामुर्डी व पुनावळ्यातील रस्त्यांसह 'पब्लिक अमेनिटीज' विकसित करण्याचे, तसेच शहरातील टपरी-पथारी व्यावसायिकांसाठी तातडीने हॉकर्स झोन उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

सांगवी, नवी सांगवी व पिंपळे गुरव परिसरात वाढते नागरीकरण लक्षात घेता पाणीपुरवठ्याची क्षमता वाढवणे गरजेचे असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर सांगवी व औंध उरो रुग्णालय परिसरात २० लाख लिटर क्षमतेची नवीन पाण्याची टाकी उभारण्याबाबत त्यांनी आग्रही भूमिका घेतली. या टाक्यांमुळे परिसरातील पाणीपुरवठा नियमित, स्वच्छ व पुरेसा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासोबतच अन्य ठिकाणी पाण्याच्या टाक्यांसाठी असलेली आरक्षणे तातडीने विकसित करण्याचे निर्देशही देण्यात आले.

बैठकीत शहरातील सुमारे १७ हजार नोंदणीकृत टपरी व पथारी व्यावसायिकांचा प्रश्नही महत्त्वाने मांडण्यात आला. या व्यावसायिकांना पर्यायी व सुसज्ज हॉकर्स झोन उपलब्ध करून देऊन त्यांचा उदरनिर्वाह सुरक्षित करावा, असे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले. याशिवाय पिंपळे सौदागर, रावेत परिसरात पोस्ट ऑफिससाठी जागा, थेरगाव व पिंपळे सौदागर येथे पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# अजितदादांच्या अस्थिकलश दर्शनावेळी शोकाकुल वातावरण

## तिसऱ्यांदा 'ड्रंक अँड ड्राइव्ह'मध्ये पकडल्यास वाहन जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अध्यक्ष व उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचा अस्थिकलश मंगळवारी सकाळी पिंपरी-चिंचवड शहरवासीयांच्या दर्शनासाठी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या आवारात आणण्यात आला. अस्थिकलशाचे दर्शन घेताना कार्यकर्ते व नागरिकांच्या भावना अनावर झाल्या होत्या. 'अजितदादा अमर रहे' अशा घोषणा परिसरात घुमत होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी खराळवाडी येथील पक्ष कार्यालयातून अस्थिकलशाची मिरवणूक काढत तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात आणला. यावेळी माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर वैशाली घोडेकर, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे, सीमा सावळे, अतुल शितोळे, सारंग कामतेकर, कार्याध्यक्ष फजल शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

स्मारकाच्या समोरील प्रांगणात फुलांनी सजविलेल्या मंचावर अस्थिकलश ठेवण्यात आला होता. सकाळपासूनच नागरिकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. दुपारी तीन वाजेपर्यंत अस्थिकलश दर्शनासाठी खुला ठेवण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी श्रद्धेने अस्थिकलशाचे दर्शन घेतले.

# पुण्यात कमाल तापमान फेब्रुवारीत सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** गेल्या दोन महिन्यांत राज्याने तीव्र थंडी व तापमानातील मोठे चढ-उतार अनुभवले. आता हिवाळा अखेरच्या टप्प्यात पोहोचला असून फेब्रुवारी महिन्यात पुण्यासह महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता हवामानतज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्यामुळे दिवसागणिक उष्णतेची तीव्रता वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे यंदा डिसेंबरमध्ये सातत्याने किमान तापमानात घट झाली. परिणामी डिसेंबर महिना मागील दशकातील सर्वांत थंड ठरला. त्यानंतर जानेवारीमध्ये हवामानात सातत्याने बदल झाले. उत्तरेकडील वाऱ्यांची दिशा व तीव्रता बदलल्याने कधी किमान तापमान एक अंकी नोंदवले गेले, तर काही वेळा ते थेट १८ अंश सेल्सियसपर्यंत वाढले.

फेब्रुवारी महिना सुरू झाल्यापासून रात्री व पहाटे आल्हाददायक गारवा, तर दिवसा कडक ऊन व उकाडा असे मिश्र वातावरण अनुभवायला मिळत आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने फेब्रुवारीमध्ये महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत कमाल व किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.


या संदर्भात हवामानशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी सांगितले की, फेब्रुवारीमध्ये पुण्यासह राज्यात कमाल तापमान वाढण्याची शक्यता आहे.

# सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची सुविधा

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय; १८ विभागीय कार्यालये सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**पिंपरी :** महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक वेगाने राबविण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अवघे दोन महिने शिल्लक राहिले असल्याने, नागरिकांना कर भरण्यास अधिक सुलभता मिळावी या उद्देशाने महापालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील सर्व १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी कर भरण्याची सुविधा अधिक व्यापक करण्यात आली असून, १८ विभागीय कर संकलन कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष कॅश काऊंटरद्वारे तसेच ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी गर्दी टाळून वेळेत कर भरणा करावा, यासाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. दरम्यान, कर संकलन विभागाकडून थकबाकीदारांविरोधात कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. दीर्घकाळापासून मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली जात असून, काही प्रकरणांमध्ये नळ कनेक्शन खंडित करण्याचे पाऊलही उचलण्यात येत आहे. त्यामुळे कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर तातडीने भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून, ऑनलाईन कर भरण्याच्या सुविधेबाबत नागरिकांना माहिती दिली जात आहे. घरबसल्या कर भरण्याचा पर्याय उपलब्ध असल्याने नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार असून, महापालिकेच्या महसूल संकलनालाही चालना मिळणार आहे. या संदर्भात अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, "पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागाच्या वतीने नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे सातत्याने आवाहन करण्यात येत आहे.

# 'काळा घोडा फेस्टिव्हल २०२६' मध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेला प्रथम क्रमांक

## थेरगाव मनपा शाळेने सादर केलेले "मानवी विचारांचे रोलरकोस्टर" या विषयावरील इन्स्टॉलेशन ठरले लक्षवेधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-चिंचवड :** मुंबई येथील प्रतिष्ठित काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत आयोजित चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार शाळांची निवड झाली होती. या विभागातील विजेत्या शाळांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा, थेरगाव या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत पहिल्यांदाच महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

थेरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी "मानवी विचारांचे रोलरकोस्टर" या विषयावर सादर केलेले इन्स्टॉलेशन परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले. टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर करून मानवी मनाचा वेग, भावनांची गुंतागुंत आणि आत्मसंयम यांचे प्रभावी प्रतीकात्मक दर्शन या मॉडेलमध्ये घडवण्यात आले आहे. हे मॉडेल सर्वोत्तम ठरले असून थेरगाव शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे मनपा शाळांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यांतील अनेक नामांकित व खासगी शाळांनी सहभाग नोंदवला होता. अशा स्पर्धात्मक वातावरणात महापालिकेच्या शाळेने मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता, कल्पकता आणि मार्गदर्शनाची पावती देणारे ठरले आहे.

> "पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांची कल्पकता, मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. महापालिकेच्या शाळांमधील गुणवत्ता आणि संधी योग्य दिशेने दिल्यास विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देखील सहज यश मिळवू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे.
>
> **—विक्रांत बगाडे,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

या इन्स्टॉलेशनची संकल्पना व निर्मिती कला शिक्षिका मुक्ता पुसाळकर-धोंगडे यांनी केली असून, त्यांना अंशकालीन शिक्षिका स्वाती मदने व दिपाली नवले यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमात सानिका पवार, श्रावणी महापुरे, दिपाली पांडगुळे, अनुजा टोमके, प्रिया होळकर, हुमेरा शेख, यशोदा राठोड, किशोरी वाबळे व समिक्षा डींगरे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये मिळालेल्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर यांच्यासह शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### इन्स्टॉलेशनची कलात्मक मांडणी

● 'मानवी विचारांचे रोलरकोस्टर' या संकल्पनेवर आधारित इन्स्टॉलेशनची कलात्मक मांडणी, प्रतीकात्मकता आणि भावनिक आशयामुळे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सायकलच्या चाकांमध्ये धावणारा घोडा विचारांची ऊर्जा आणि इच्छाशक्ती दर्शवतो, तर दोरी पकडून उभी असलेली मुलगी आत्मसंयम आणि विवेकाचे प्रतीक ठरते. वेस्ट मटेरियलमधून घडवलेले चेहरे, मानवी आकृती आणि त्रिमितीय रचना जीवनातील संघर्ष, अनुभव आणि मानसिक चढ-उतार अधोरेखित करतात. विचारांवर नियंत्रण ठेवून अनुभवांना योग्य दिशा देण्याचा संदेश देणाऱ्या या इन्स्टॉलेशनमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धेत मानांकन मिळाले असून, त्यांच्या सर्जनशीलतेने राष्ट्रीय स्तरावर कौतुकास पात्र ठरले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या गटनेतेपदी जेष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गटनेता विरोधी पक्षनेता असणार आहे.

महापालिकेची निवडणूक उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी प्रतिष्ठेची केली होती. त्यांनी स्वतः उमेदवार ठरविण्यापासून प्रचाराची धुरा सांभाळली. महापालिकेतील कथितभ्रष्टाचारावरुन भाजपच्या स्थानिक नेत्यांना लक्ष्य केले होते. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेसला अपयश आले. या पक्षाचे ३७ नगरसेवक निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. त्यामुळे या पक्षाचा गटनेता विरोधी पक्षनेता असणार आहे. या पदासाठी माजी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्यासह प्रभाग क्रमांक २० मधील चारही नगरसेवक निवडून आणणारे पॅनेल प्रमुख संदीप वाघेरे, माजी महापौर वैशाली घोडेकर इच्छुक होते. चुकीच्या कामाविरोधात बोलणारा आणि आक्रमक चेहरा विरोधी पक्षनेते पदासाठी देणार असल्याचे संकेत उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी दिले होते. अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाले. त्यामुळे गटनेता नोंदविण्याची प्रक्रिया रखडली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे गटनेता पदासाठी इच्छुकांची नावे पाठवली होती. तटकरे यांनी जेष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार शहराध्यक्ष योगेश बहल यांनी भाऊसाहेब भोईर यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र विभागीय आयुक्तांना दिले .

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### राष्ट्रवादीच्या विलीनीकरण चर्चांना पुन्हा उधाण

**बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणावरून राज्याच्या राजकारणात पुन्हा हालचालींना वेग आला आहे. अजित पवार यांनी विलीनीकरणाबाबत चर्चा केली नव्हती, असे प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले असले तरी बारामतीतील घडामोडींमुळे चर्चांना बळ मिळाले आहे. शरद पवार यांनी पार्थ व जय पवार यांच्यासोबत घेतलेली बंद दरवाजाआड बैठक आणि किरण गुजर यांचा दावा यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

### राजगड तालुक्यात निवडणूक यंत्रणा सतर्क

**वेल्हे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजगड तालुका निवडणूक कार्यालयाकडून मतदान प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष राहावी यासाठी कडक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. दुबार मतदान टाळण्यासाठी प्रत्येक मतदाराची ओळख काटेकोरपणे तपासली जाणार आहे. वैध ओळखपत्राची खातरजमा, मतदार यादी तपासणी व अमिट शाई लावण्याची प्रक्रिया अत्यंत दक्षतेने केली जाणार आहे.

### बालमजुरी निर्मूलनासाठी कृती समिती स्थापन

**आंबेगाव :** बालमजुरी ही अनिष्ट प्रथा कायमस्वरुपी दूर करून बालमजुरांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हास्तरीय बालकामगार कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. बालमजुरांचे पुनर्वसन, संरक्षण व शिक्षण यासाठी समितीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून विविध स्तरांवरील विषयवार समित्यांच्या शिफारशींचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन या समितीत प्रशासन, पोलीस, शिक्षण, आरोग्य, महिला-बालविकास व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी आहेत.

---

**१० फेब्रुवारीच्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव सादर; एप्रिलपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता**

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी कर्ज उभारणीचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** भविष्यातील पुणे शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीला गती देण्यात आली आहे. या विमानतळासाठी आवश्यक भूसंपादनाचा निधी उभारण्यासाठी राज्य सरकारकडून कर्ज घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर विमानतळाच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे.

वर्षा निवासस्थानी आयोजित पुरंदर विमानतळाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव (उद्योग) पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू तसेच ऑनलाइन माध्यमातून पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थित होते.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावांमध्ये हे विमानतळ प्रस्तावित असून, सुमारे तीन हजार एकर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. या भूसंपादनासाठी अंदाजे सहा हजार कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. हा निधी उभारण्यासाठी राज्य सरकार कर्ज घेणार असून, मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव 'हुडको'कडे पाठवण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले की, "पुरंदर विमानतळामुळे हा परिसर झपाट्याने विकसित होणार आहे. हा विकास नियोजनबद्ध आणि नियंत्रित असणे अत्यंत आवश्यक आहे. अनियंत्रित नागरीकरण टाळण्यासाठी सिडकोने पुढाकार घेऊन या भागाचा विकास आराखडा तयार करावा. नवी मुंबईप्रमाणे सुनियोजित विकासाचा आदर्श येथे राबवण्यात यावा."

मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर फेब्रुवारी अखेरपर्यंत भूसंपादनासाठीचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढील आठवडाभरात शेतकऱ्यांना मोबदल्याचे वाटप सुरू होऊ शकते. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एप्रिलच्या मध्यापासून विमानतळाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारल्यास पुणे शहरावरील वाढता ताण कमी होण्यास मदत होणार असून, औद्योगिक, व्यापारी आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने संपूर्ण परिसराच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

---

# लोणी-जारकरवाडी-मंचर रस्त्याला झाडझुडपांचा विळखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी-जारकरवाडी-मंचर हा महत्त्वाचा रस्ता सध्या दाट काटेरी झाडे व झुडपांमुळे अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः धामणी (ता. आंबेगाव) येथील ज्ञानेश्वर मंदिराजवळ लोणीच्या दिशेने असलेल्या घाटवळणावर झाडझुडपांनी रस्त्याला विळखा घातला असून वाहनचालकांना समोरचा रस्ता स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे या ठिकाणी अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

सदर वळण आधीपासूनच धोकादायक म्हणून ओळखले जाते. मात्र रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडझुडपांमुळे हा धोका अधिकच वाढला आहे. अनेक वेळा या ठिकाणी अपघात होता होता टळल्याच्या घटना घडल्या असून, भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मार्गावरून शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, स्थानिक नागरिक, शेतकरी तसेच पर्यटक मोठ्या प्रमाणावर दररोज प्रवास करतात. त्यामुळे रस्त्यावर नेहमीच मोठी वर्दळ असते. या घाटवळणावर लोणीच्या दिशेने जाताना डाव्या बाजूला पाणीपुरवठ्याची पाईपलाईन आहे. ही पाईपलाईन अनेक ठिकाणी गळती झाल्याने पाणी थेट रस्त्यावर येते. पावसाळ्याबरोबरच पाणी सोडले असतानाही रस्ता ओला राहतो. वळण, रस्त्यावरचे पाणी आणि दाट झाडझुडपे यामुळे वाहनांचे नियंत्रण सुटण्याचा धोका वाढतो. त्यामुळे दुचाकीस्वार, चारचाकी चालक तसेच अवजड वाहनांसाठी हा मार्ग अधिकच जोखमीचा ठरत आहे. अलीकडेच धामणी येथील श्री म्हाळसाकांत खंडोबाच्या यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने भाविक या मार्गावरून ये-जा करत होते. झाडझुडपे व रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. या मार्गावर झाडझुडपांमुळे अपघात घडल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

---

# धामणीतील श्री म्हाळसाकांत खंडोबाच्या यात्रेत पारंपारिक वाद्यांनी रंगला सभामंडप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**धामणी (ता. आंबेगाव) :** येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबाच्या यात्रेनिमित्त कुलाचार प्रथेनुसार मानाच्या काठीचा सोहळा पार पडल्यानंतर मंदिराच्या सभामंडपात पारंपारिक वाद्यांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पंचक्रोशीतील पंचरास, राजगुरु, गायकवाड, आल्हाट व खुडे मंडळींच्या सहभागाने सादर झालेल्या वादनामुळे मंदिर परिसर भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भारावून गेला.

ढोलकी, ताशा, हलगी आदी पारंपारिक वाद्यांच्या गजराने सभामंडप दुमदुमून गेला होता. या वाद्य सोहळ्यास भाविक व ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती. दत्ता गायकवाड (अवसरी बुद्रुक), स्वानंद काळोखे (चास), दादू व संदीप पंचरास (लोणी), बाळू हेगडे (दौंड), ढोलकी पटू पमाजी पंचरास (धामणी), सुरेश खुडे, सुभाष पंचरास, भगवान काळोखे आदी वादकांनी आपल्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक तालावर प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट होत होता.

वाद्य सोहळ्यात सहभागी झालेल्या वाजंत्री व वादक मंडळींचा ग्रामस्थांच्या वतीने मानपत्र देऊन तसेच फेटा बांधून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप पंचरास यांनी केले.

यावेळी देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष प्रकाश जाधव पाटील, सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, कैलास बोऱ्हाडे, प्रभाकर पंचरास यांच्यासह अनेक भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेच्या निमित्ताने साजरा झालेला हा पारंपारिक वाद्यांचा सोहळा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

---

# चवळीचे पीक ठरतेय शेतकऱ्यांसाठी लाभदायक

**आधुनिक पद्धतीमुळे उत्पादनात वाढ; आंबेगाव तालुक्यात चवळी तोडणी वेगात**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या चवळीच्या पिकाची तोडणी जोमात सुरू असून हे पीक शेतकऱ्यांसाठी चांगलेच फायदेशीर ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कमी कालावधीत तयार होणारे, नियमित तोडणी देणारे आणि बाजारात कायम मागणी असलेले हे पीक सध्या शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार बनले आहे.

यंदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी चवळीची लागवड आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून केली आहे. मल्चिंग पेपरचा वापर, तारेवर चवळीची वाढ आणि ठिबक सिंचन प्रणाली यामुळे पिकाची वाढ जोमाने झाली आहे. या पद्धतीमुळे तणांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून पाणी व खतांचा योग्य वापर झाल्याने उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. परिणामी चवळीच्या शेंगा दर्जेदार, लांबट आणि आकर्षक मिळत आहेत.

सध्या बाजारात चवळीला प्रतिकिलो सुमारे ४० रुपये दर मिळत असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर शेतकऱ्यांसाठी समाधानकारक ठरत आहे. बियाणे, मजुरी, खत आणि पाणी यांचा खर्च वजा जाता चवळीच्या पिकातून चांगला नफा मिळत असल्याचे शेतकरी सांगतात. विशेष म्हणजे आंबेगाव तालुक्यातील मंचर तसेच जुन्नर तालुक्यातील नारायणगाव या नजीकच्या बाजारपेठांमध्ये चवळीची विक्री होत असल्याने वाहतुकीचा खर्चही कमी येत आहे.

वाहतूक खर्च कमी आणि बाजारात मागणी चांगली असल्यामुळे चवळीच्या विक्रीतून शेतकऱ्यांच्या हातात अधिक पैसे उरत आहेत. काही शेतकरी आठवड्यातून दोन ते तीन वेळा तोडणी करून नियमित बाजारात माल पाठवत आहेत. त्यामुळे सतत रोख उत्पन्न मिळत असून कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवणे सोपे झाले आहे.

पारंपरिक पिकांच्या तुलनेत चवळीचे पीक कमी कालावधीत उत्पन्न देणारे असल्याने शेतकऱ्यांचा कल या पिकाकडे वाढताना दिसत आहे. हवामान अनुकूल राहिल्यास आणि बाजारात दर टिकून राहिल्यास पुढील हंगामात आणखी अधिक शेतकरी चवळीच्या लागवडीकडे वळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधुनिक शेती पद्धती आणि योग्य बाजारपेठेचा लाभ घेतल्यास चवळीचे पीक शेतकऱ्यांसाठी 'सोन्याचे पीक' ठरत असल्याचे चित्र आंबेगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे.

---

# निसर्गराजा मित्र जिवांचे पुणे संस्थेकडून जि.प. शाळेत वाचनसंस्कृतीला चालना

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वाचनालयाची स्थापना**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या निसर्गराजा मित्र जिवांचे – पुणे या संस्थेच्या वतीने ओतूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक १ मध्ये पुस्तक वाचनालयाची स्थापना करण्यात आली असून आधुनिक शिक्षणासाठी लॅपटॉपचेही वितरण करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागण्यासोबतच डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमांतर्गत शाळेच्या लायब्ररीसाठी आवश्यक असलेले कपाट तसेच शेकडो दर्जेदार पुस्तके संस्थेच्या माध्यमातून शाळेला देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच कथा, विज्ञान, सामान्य ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित पुस्तके वाचण्याची संधी मिळणार आहे, अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा डुंबरे यांनी दिली.

याशिवाय निसर्गराजा मित्र जिवांचे – पुणे संस्था आणि नेव्हिगेशन क्षेत्रात कार्यरत टॉम टॉम इंडिया प्रा. लि. यांच्या सहकार्याने डेल कंपनीचे लॅपटॉप शाळेला प्रदान करण्यात आले. या लॅपटॉपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान, डिजिटल शिक्षण साहित्य तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देता येणार आहे.या साहित्याचे वितरण संस्थेचे संस्थापकीय संचालक राहुल घोलप यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन डुंबरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच समितीचे सदस्य नितीन पानसरे, डॉ. योगेश गायकर, जितेंद्र घुले, सुधीर डेरे, प्रतीक्षा ढोकळे, प्रेरणा तांबे, पूजा दिवेकर, विद्या हाडवळे, कविता डुंबरे, रेश्मा डुंबरे, राहुल तांबे, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे आणि विस्तार अधिकारी व्ही. आर. धोंडगे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.



शिंगवे (ता. आंबेगाव) येथे थंडीमुळे मुळ्याच्या पिकाला अकाली फुले आल्याने उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. (छाया : किशोर खुडे)

---

**पारंपारिक वाजंत्रींच्या सुरांनी गावोगावी आनंदाचे वातावरण; ग्रामीण अर्थकारणालाही चालना**

# आंबेगाव तालुक्यात लग्नसराईचा जल्लोष; विवाहसोहळ्यांची धामधूम सुरू!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या लग्नसराईचा उत्साह शिगेला पोहोचला असून गावोगावी विवाहसोहळ्यांची धामधूम सुरू आहे. शुभ मुहूर्तावर मोठ्या संख्येने विवाह पार पडत असल्याने संपूर्ण तालुक्यात आनंदी, उत्साही आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. या लग्नसराईमुळे पारंपारिक वाजंत्री कलाकारांच्या हाताला पुन्हा भरघोस काम मिळू लागले असून, अनेक वर्षांनंतर त्यांचे दिवस उजळताना दिसत आहेत.

लग्न मिरवणुका, वरात, हळदी समारंभ, स्वागत सोहळे अशा प्रत्येक कार्यक्रमात हलगी, सनई, सूर, ताशा आणि ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला आहे. पारंपारिक वाद्यांचे नाद दूरवर पसरत असून, लग्नाचा जल्लोष ऐकू येताच गावकऱ्यांमध्येही उत्साह संचारतो आहे. आधुनिक डीजेच्या जोडीला पुन्हा एकदा पारंपारिक वाजंत्रींना प्राधान्य दिले जात असल्याने ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन घडत आहे.

तालुक्यातील अनेक वाजंत्री कलाकारांना सध्या सलग कार्यक्रम मिळत असून, एका दिवसात दोन ते तीन ठिकाणी कार्यक्रम करण्याची वेळ येत आहे. मागील काही वर्षांत आधुनिक संगीतप्रकारांमुळे पारंपारिक वाजंत्रींची मागणी घटली होती. मात्र यंदाच्या लग्नसराईत परिस्थिती बदलल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. "सनई-ढोलाच्या सुरांशिवाय लग्नाची मजा येत नाही," अशी भावना वधू-वर पक्षांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे मुद्दाम पारंपारिक वाजंत्री कलाकारांची निवड करत आहेत.

या वाढत्या मागणीमुळे वाजंत्री कलाकारांमध्ये समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. अनेक कलाकार सांगतात की, लग्नसराई हा त्यांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा काळ असून, यंदा मिळणारे काम त्यांना आर्थिकदृष्ट्या आधार देणारे ठरत आहे. पारंपारिक कलेला पुन्हा मान मिळत असल्याने त्यांचा आत्मविश्वासही वाढला आहे.

लग्नसराईचा फायदा केवळ वाजंत्री कलाकारांपुरता मर्यादित राहिलेला नाही. फुलविक्रेते, मंडप व्यावसायिक, केटरिंग सेवा, छायाचित्रकार, व्हिडिओग्राफर, सजावट व्यावसायिक यांच्याही कामात मोठी वाढ झाली आहे. परिणामी ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना मिळत असून, अनेक छोट्या व्यावसायिकांच्या हाताला रोजगार मिळत आहे.

एकूणच, आंबेगाव तालुक्यातील सध्याची लग्नसराई केवळ आनंदाचा उत्सव ठरत नसून, पारंपारिक कला, संस्कृती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणारी ठरत आहे.

---

# मंचर येथे श्री विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** माघ शुद्ध त्रयोदशी निमित्त मंचर (ता. आंबेगाव) येथे श्री विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने श्री विश्वकर्मा मंदिर व श्री मुक्ताई मंदिर प्रांगणात भगवान श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गेल्या २५ वर्षांपासून हा सोहळा लोहार व सुतार समाज बांधवांसह ग्रामस्थांच्या उपस्थितीत आनंदात साजरा केला जात आहे.

उत्सवाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायणाने झाली. त्यानंतर श्रींचा अभिषेक, सत्यनारायण पूजा व होमहवन विधी पार पडले. सकाळी ११ वाजता ह.भ.प. शांताराम महाराज बारवेकर यांच्या सुश्राव्य प्रवचनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. प्रवचनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दुपारनंतर भगवान श्री विश्वकर्मा यांची मंचर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पारंपारिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी फुगड्या खेळत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. शहरभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मिरवणूक संपन्न झाल्यानंतर महिलांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांना सुंदर भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## सारांश वृत्त

### सायबर फसवणुकीतून २२ जणांना अटक

**पाटणा :** सायबर फसवणुकीत सहभागी असल्याच्या आरोपाखाली बिहारच्या पाटणा जिल्ह्यातून १५ महिलांसह बावीस जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. पाटणाच्या सगुणा मोर आणि रुपसपूर भागात लखन कुटीर, वेद नगर आणि सौभाग्य शर्मा पथ या तीन ठिकाणी छापे टाकून त्यांना अटक करण्यात आली. लोकांची फसवणूक करण्यासाठी बेकायदेशीर कॉल सेंटर चालवले जात होते. छाप्यांदरम्यान, १५ महिला आणि सात पुरुषांना अटक करण्यात आली.

### शुल्लक वादातून दुकानदाराची हत्या

**बेळगावी :** सिगारेटच्या पैशावरून झालेल्या वादानंतर दारू पिऊन झालेल्या वादात जीवघेणा बदल झाला आणि त्यात जिल्ह्यातील एका दुकान मालकाचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. मंगळवारी रात्री ही घटना घडली, जेव्हा एका दुकानाच्या मालकाने सिगारेटसाठी पैसे मागितले तेव्हा चार मद्यधुंद तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यामुळे त्याचा मृत्यू झाला, असे त्यांनी सांगितले. मृताचे नाव यल्लप्पा दुर्गाप्पा नाईक (४८) असे असून, तो एका प्रोव्हिजन स्टोअरचा मालक होता.



### काळवीटांच्या संख्येत झपाट्याने वाढ

**बेरहमपूर :** ओडिशाच्या गंजम जिल्ह्यात गेल्या एका वर्षात काळवीटांच्या संख्येत ४९८ ने वाढ झाली आहे, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. २९ जानेवारी रोजी वन विभागाने केलेल्या गणनेनुसार, जिल्ह्यात एकूण काळवीटांची संख्या ९,२८७ होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, २०२५ मध्ये लोकसंख्या ८,७८९, २०२३ मध्ये ७,२७३, २०२१ मध्ये ७,३५८ आणि २०२० मध्ये ६,८७५ इतकी होती.

## दक्षिण काश्मीरमधील सफरचंद उत्पादकांना दिलासा

# तीन रेल्वे प्रकल्पांना केंद्राची स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** दक्षिण काश्मीरमधील सफरचंद उत्पादक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत केंद्र सरकारने बिजबेहरा-पहलगाम, अवंतीपोरा-शोपियान यांसह तीन प्रस्तावित रेल्वे प्रकल्पांना स्थगिती दिली आहे. या प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणावर सफरचंद बागा उद्ध्वस्त होऊन हजारो कुटुंबांच्या उपजीविकेला धोका निर्माण होईल, अशी तीव्र चिंता स्थानिक बागायतदारांनी व्यक्त केली होती.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्वनी कुमार यांनी सांगितले की, श्रीनगर ते बारामुल्ला दरम्यान आधीच रेल्वे मार्ग अस्तित्वात असून कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी तीन अतिरिक्त मार्गांचे प्रस्ताव होते. मात्र जम्मू-काश्मीर सरकार तसेच स्थानिक खासदारांनी या मार्गांबाबत आक्षेप नोंदवले. "या मार्गांची उभारणी झाली तर शेती आणि बागायतींना मोठे नुकसान होईल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यानंतर हे प्रकल्प थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला," असे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या सर्वेक्षणाच्या टप्प्यात असलेले हे प्रस्तावित रेल्वे संरेखन दक्षिण काश्मीरमधील सफरचंद बागांमधून जाणार होते. त्यामुळे शोपियान, पुलवामा आणि अनंतनाग जिल्ह्यातील बागायती क्षेत्रांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि बागायतदारांनी सातत्याने विरोध करत, बागा नष्ट होण्यासोबतच कुटुंबांचे विस्थापन आणि उत्पन्नात घट होईल, असा इशारा दिला होता.

"ज्या तीन प्रकल्पांचे सर्वेक्षण सुरू होते, त्यातून सफरचंद बागांचे नुकसान होण्याची शक्यता होती. त्यामुळे ते सध्या थांबवण्यात आले आहेत," असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले. शोपियानचे आमदार अली मोहम्मद कुल्ले यांनी या निर्णयाचे स्वागत करत काकापोरा-शोपियान रेल्वे प्रकल्प अधिकृतपणे रद्द झाल्याचे सांगितले. "या संरेखनामुळे या भागाच्या आर्थिक कण्याला—फलोत्पादन क्षेत्राला—मोठा धोका निर्माण झाला होता. सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा सखोल विचार करूनच हा प्रकल्प रद्द करण्यात आला," असे त्यांनी नमूद केले.

पीडीपीच्या प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनीही या निर्णयाचे स्वागत केले. यामुळे "काश्मीरच्या कृषी अर्थव्यवस्थेला अत्यंत आवश्यक असा दिलासा" मिळाल्याचे त्या म्हणाल्या. भविष्यातील कोणत्याही विकास योजनांमध्ये शेतकरी आणि स्थानिक समुदायांचा निर्णयप्रक्रियेत समावेश करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, अनंतनाग-पहलगाम आणि अनंतनाग-शोपियान दरम्यानचे प्रस्तावित ट्रॅक थांबवण्यासाठी हस्तक्षेप केल्याबद्दल नॅशनल कॉन्फरन्सचे प्रवक्ते इम्रान नबी दार यांनी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि पक्षाच्या खासदारांचे आभार मानले. या निर्णयामुळे उपजीविका आणि फळबागांचे संरक्षण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अर्थसंकल्पात केरळकडे दुर्लक्ष; विधानसभेत ठराव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये केरळच्या दीर्घकालीन आणि महत्त्वाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत केरळ विधानसभेने बुधवारी एक ठराव मंजूर केला.

मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी मांडलेला हा ठराव विरोधी पक्ष यूडीएफच्या अनुपस्थितीत संमत झाला. सबरीमाला सोने चोरीच्या मुद्द्यावरून यूडीएफने विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला होता.

या ठरावात केंद्र सरकारने सहकारी संघराज्याच्या तत्त्वांचा आदर करत केरळच्या संतुलित विकासासाठी आवश्यक निर्णय घ्यावेत, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्था (एम्स) स्थापन करणे, तसेच संपूर्ण राज्यासाठी हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरला मान्यता देणे या प्रमुख मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून केरळ एम्सची मागणी करत आहे. मात्र केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याची खंत ठरावात व्यक्त करण्यात आली आहे.

कासारगोड ते तिरुवनंतपुरम दरम्यानचा ५७३ किलोमीटर लांबीचा प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर सुमारे १३ तासांचा प्रवास कमी करू शकतो आणि राज्याच्या आर्थिक विकासाला गती देणारा ठरेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय कोच फॅक्टरी, विझिंजम बंदराला सशर्त पाठिंबा, कन्नूर आंतरराष्ट्रीय विमानतळाला पॉइंट-ऑफ-कॉल सुविधा, तसेच वायनाडमधील भूस्खलनग्रस्तांसाठी मदत या मुद्द्यांकडेही केंद्राने दुर्लक्ष केल्याबद्दल विधानसभेने चिंता व्यक्त केली आहे.

# आता चीनकडून सकारात्मक संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार अंतिम टप्प्यात असल्याच्या वृत्तांच्या दरम्यान चीनकडूनही सकारात्मक संकेत मिळाले आहेत. चीनचे भारतातील राजदूत झू फेहोंग यांनी मंगळवारी सांगितले की, २०२५ मध्ये भारत-चीन द्विपक्षीय व्यापार १५५ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचण्याची शक्यता आहे. हा आकडा गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांनी अधिक आहे.

चीनच्या नववर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना झू फेहोंग यांनी सांगितले की, भारताची चीनकडे होणारी निर्यातही ९.७ टक्क्यांनी वाढली आहे. या वाढीमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्याच्या व्यापक शक्यतांकडे लक्ष वेधले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

राजदूत झू यांनी भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाला चीनचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट करत, बहुपक्षीय मंचांवर भारतासोबत समन्वय अधिक मजबूत करण्याची तयारी दर्शवली. ग्लोबल साऊथच्या विकासासाठी चीन भारतासोबत एकत्र काम करण्यास वचनबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारत-चीन द्विपक्षीय संबंधांबाबत बोलताना झू फेहोंग म्हणाले की, गेल्या वर्षी तियानजिन येथे झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची झालेली भेट महत्त्वाची ठरली. त्या बैठकीनंतर दोन्ही देशांतील संबंधांमध्ये सातत्याने सुधारणा होत असल्याचा दावा त्यांनी केला.

"तियानजिनमध्ये राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची यशस्वी बैठक झाली. या बैठकीमुळे भारत-चीन संबंध 'पुनर्स्थापना आणि नव्या सुरुवाती'सह सुधारण्याच्या नव्या टप्प्यावर पोहोचले आहेत," असे झू फेहोंग यांनी नमूद केले.

# रशियन तेल खरेदी थांबवण्याचे आश्वासन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**न्यू यॉर्क/वॉशिंग्टन :** भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या नव्या व्यापार कराराचे व्हाईट हाऊसने स्वागत केले असून, या कराराअंतर्गत भारताने रशियन कच्च्या तेलाची खरेदी थांबवण्याचे आश्वासन दिल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील वाहतूक, ऊर्जा आणि कृषी क्षेत्रांत सुमारे ५०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली आहे.

व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी ही माहिती पत्रकारांना दिली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्यात थेट चर्चा होऊन हा महत्त्वाचा व्यापार करार करण्यात आला असून, दोन्ही नेत्यांमध्ये उत्तम संबंध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

लेविट म्हणाल्या की, भारताने केवळ रशियन तेल खरेदी न करण्याचेच नव्हे, तर अमेरिकेकडून तसेच संभाव्यतः व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्याचेही आश्वासन दिले आहे. या निर्णयाचा थेट फायदा अमेरिकन अर्थव्यवस्था आणि नागरिकांना होणार असल्याचा दावा त्यांनी केला. या करारानुसार भारत अमेरिकेत ऊर्जा, वाहतूक आणि कृषी क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार असून, ट्रम्प प्रशासनाने याला 'अमेरिकन कामगार, उद्योग आणि ग्राहकांसाठी मोठा विजय' असे संबोधले आहे. याच पार्श्वभूमीवर अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे, तर भारताने अमेरिकन वस्तूंवरील सर्व कर आणि नॉन-टॅरिफ अडथळे शून्यावर आणण्यास सहमती दर्शविली आहे.

ट्रम्प प्रशासनाने यापूर्वी भारतावर ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले होते. त्यात रशियन तेल खरेदी सुरू ठेवल्यास २५ टक्के दंडात्मक शुल्क आकारण्याची तरतूद होती. नव्या करारामुळे ही स्थिती बदलली असून, विश्लेषकांच्या मते भारताच्या कच्च्या तेल आयातीत रशियाऐवजी व्हेनेझुएलाचा वाटा वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेला 'अद्भुत' असे संबोधले. 'मेड इन इंडिया' उत्पादनांवर आता कमी शुल्क आकारले जाणार असल्याचा आनंद व्यक्त करत त्यांनी १.४ अब्ज भारतीयांच्या वतीने ट्रम्प यांचे आभार मानले. दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही एकत्र काम करत असतील, तर त्याचा थेट फायदा जनतेला होतो, असे नमूद करत मोदी यांनी भारत-अमेरिका भागीदारी भविष्यात आणखी मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# जयशंकर-बेसेंट भेटीत आर्थिक भागीदारीवर चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**न्यू यॉर्क/वॉशिंग्टन :** परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांची भेट घेऊन भारत-अमेरिका आर्थिक भागीदारी आणि धोरणात्मक सहकार्य अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा केली. ही भेट वॉशिंग्टन डीसी येथे झाली.

मंगळवारी 'एक्स'वरील पोस्टमध्ये जयशंकर यांनी या भेटीबद्दल माहिती देताना, भारत-अमेरिका आर्थिक सहकार्य वाढवण्यावर उपयुक्त चर्चा झाल्याचे नमूद केले. दुसरीकडे, स्कॉट बेसेंट यांनीही या भेटीचे स्वागत करत, पुरवठा साखळी सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व तसेच परस्पर हितसंबंधांशी संबंधित राष्ट्रीय व आर्थिक सुरक्षेच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे सांगितले. जयशंकर सध्या २ ते ४ फेब्रुवारीदरम्यान अमेरिकेच्या दौऱ्यावर असून, बुधवारी परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या 'क्रिटिकल मिनरल्स' विषयक मंत्रिस्तरीय बैठकीत सहभागी होणार आहेत. याशिवाय, त्यांनी परराष्ट्र खात्यात रुबियो यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेदरम्यान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या नव्या व्यापार कराराचे स्वागत करण्यात आले. तसेच महत्त्वपूर्ण खनिजांच्या शोध आणि खाणकामासंदर्भातील द्विपक्षीय सहकार्य औपचारिक करण्यावरही चर्चा झाली. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर व्यापार कराराची घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी या उच्चस्तरीय बैठका झाल्या. स्कॉट बेसेंट यांनी भारताच्या रशियन तेल खरेदीबाबत टीकात्मक भूमिका घेतली आहे. अलीकडे भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी काही युरोपीय देशांवर नाराजी व्यक्त केली. रशियन तेल खरेदीबाबत भारतावर शुल्क लादण्याच्या मुद्द्यावर युरोपने अमेरिकेला साथ दिली नसल्याचा आरोप त्यांनी केला होता.

## सर्वोच्च न्यायालयाचे अहवाल सादर करण्याचे निर्देश

# एडीएजी प्रकरणी चौकशीचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अनिल धीरूभाई अंबानी ग्रुप (एडीएजी), अनिल अंबानी आणि समूहातील कंपन्यांशी संबंधित कथित मोठ्या बँकिंग व कॉर्पोरेट फसवणुकीप्रकरणी "निष्पक्ष, त्वरित आणि निःपक्षपाती" चौकशी करण्याचे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) आणि अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) दिले.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील तपासाच्या प्रगतीबाबत सीबीआय आणि ईडीकडून चार आठवड्यांच्या आत नवे स्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तपास सुरू करण्यात यंत्रणांनी विलंब केल्याचे निरीक्षण नोंदवत, खंडपीठाने ईडीला वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यास सांगितले.

अनिल अंबानी आणि एडीएजी यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि श्याम दिवान हजर राहिले. खंडपीठाने अंबानी आणि समूहाला जनहित याचिकेला उत्तर देण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली. अंबानी देशाबाहेर जाऊ नयेत, अशी मागणी करणाऱ्या सूचनेला रोहतगी यांनी विरोध केला. अंबानी भारतातच राहतील आणि न्यायालयाच्या परवानगीशिवाय देश सोडणार नाहीत, असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, तपास यंत्रणांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, संबंधित व्यक्ती देश सोडू नयेत यासाठी विविध 'लूकआउट सर्क्युलर' जारी करण्यात आले आहेत. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात सीबीआय आणि ईडीला सीलबंद लिफाफ्यात स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. १८ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने केंद्र सरकार, सीबीआय, ईडी, अनिल अंबानी आणि एडीएजी यांना या जनहित याचिकेबाबत नोटीस बजावली होती. त्यावेळी खंडपीठाने ही शेवटची संधी असून उत्तर दाखल करावे, असे स्पष्ट केले होते.

ईएएस सरमा यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत अनिल अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स एडीएजी समूहातील अनेक कंपन्यांमध्ये सार्वजनिक निधीचे पद्धतशीर वळवण, आर्थिक विवरणपत्रांमध्ये कथित बनावटपणा तसेच संस्थात्मक पातळीवरील सहभागाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

# अदानी डिफेन्स आणि लिओनार्डो यांच्यात भागीदारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अदानी डिफेन्स अँड एरोस्पेसने मंगळवारी इटलीतील आघाडीची संरक्षण कंपनी लिओनार्डोसोबत भारतात हेलिकॉप्टर उत्पादन, देखभाल आणि टिकवणूक यासाठी धोरणात्मक भागीदारी जाहीर केली. भारतीय सशस्त्र दलांच्या विविध श्रेणींतील सुमारे १,००० हून अधिक हेलिकॉप्टरच्या संभाव्य मागणीच्या पार्श्वभूमीवर हे सहकार्य करण्यात आले आहे.

दोन्ही कंपन्यांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून,




त्याअंतर्गत "भारतात पूर्णपणे एकात्मिक हेलिकॉप्टर उत्पादन परिसंस्था" उभारण्याचा उद्देश आहे. यामुळे भारत लष्करी हेलिकॉप्टर उत्पादनासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे.

या मागणीत ३०० हून अधिक हलकी उपयुक्तता हेलिकॉप्टर, ३०० हून अधिक मध्यम-उचलणारी हेलिकॉप्टर, इंटरमीडिएट श्रेणीतील १०० पेक्षा जास्त प्लॅटफॉर्म आणि ९० हून अधिक सागरी बहुउद्देशीय हेलिकॉप्टरचा समावेश आहे. अदानी डिफेन्सने स्पष्ट केले की या कार्यक्रमात टप्प्याटप्प्याने स्वदेशीकरण, भारतात देखभाल-दुरुस्ती-ओव्हरहॉल सुविधा उभारणे तसेच पायलट प्रशिक्षण पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला जाईल.

नवी दिल्लीतील एका कार्यक्रमात संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. संरक्षण उत्पादनातील स्वयंपूर्णता ही हळूहळू साध्य होणारी प्रक्रिया असल्याचे त्यांनी सांगितले आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमाअंतर्गत सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. अदानी डिफेन्स अँड एरोस्पेसचे संचालक जीत अदानी यांनी ही भागीदारी भारतासाठी निर्णायक टप्पा असल्याचे सांगत, यामुळे जागतिक तांत्रिक कौशल्य आणि देशांतर्गत औद्योगिक क्षमता यांचा संगम होईल, तसेच उच्च-कुशल रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## जम्मू-काश्मीर विधानसभेबाहेर धरणे

**जम्मू :** भाजप आमदारांनी जम्मू आणि काश्मीर विधानसभेबाहेर धरणे आंदोलन केले आणि सभागृहातून वॉकआउट केले. त्यांनी आरोप केला की सभापती अब्दुल रहीम राथेर विरोधी पक्षाचा आवाज दाबत आहेत आणि सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची वेळ देताना पक्षपातीपणा दाखवत आहेत. सभागृहात निषेध केल्यानंतर भाजप सदस्यांनी सभात्याग केला. विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांच्या नेतृत्वाखाली सर्व आमदारांनी धरणे धरले.

# ऑनलाइन गेमिंगच्या वादातून तिघा बहिणींची आत्महत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गाझियाबाद :** बुधवारी पहाटे गाझियाबादमधील एका बहुमजली इमारतीच्या नवव्या मजल्यावरून उडी मारून तीन अल्पवयीन बहिणींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. अतिरेकी ऑनलाइन गेमिंगवरून घरात झालेल्या वादातून ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १२, १४ आणि १६ वर्षांच्या या तिन्ही बहिणी टीला मोर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भारत सिटी टाउनशिपमधील त्यांच्या निवासी टॉवरखाली पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. पहाटे सुमारे २ ते २.१५ वाजण्याच्या सुमारास मोठा आवाज ऐकू आल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेत मुलींना लोणी येथील रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सहाय्यक पोलिस आयुक्त (शालिमार गार्डन) अतुल कुमार सिंह यांनी सांगितले की, प्राथमिक चौकशीतून या बहिणींना ऑनलाइन टास्क-आधारित इंटरॅक्टिव्ह गेमचे वाढते व्यसन लागल्याचे संकेत मिळाले आहेत. त्या गेमिंगवर मोठ्या प्रमाणात वेळ घालवत असल्याने पालकांनी त्यास विरोध केला होता. यावरून घरात चर्चा आणि मतभेद झाल्याचे दिसून येते, असे त्यांनी नमूद केले.

## हत्या, भीती आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गंभीर प्रश्न

# बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवर वाढता हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशमध्ये हिंदू अल्पसंख्याक समुदायाविरुद्ध हिंसाचाराच्या घटना सातत्याने वाढत असल्याने देशात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. डिसेंबरमध्ये २७ वर्षीय हिंदू कापड कारखान्यातील कामगार दिपू चंद्र दास यांच्या अमानुष हत्येने ही समस्या पुन्हा एकदा तीव्रपणे समोर आली आहे. प्रेषित मुहम्मद यांच्याविरोधात अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप करत संतप्त जमावाने दिपूवर त्याच्या कामाच्या ठिकाणी हल्ला केला. त्याला बेदम मारहाण करून ठार मारण्यात आले, मृतदेह झाडाला




लटकवण्यात आला आणि नंतर जाळण्यात आला. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर पसरताच संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली.

या घटनेनंतर ढाका आणि इतर शहरांत निदर्शने झाली. गुन्हेगारांना कठोर शिक्षा द्यावी आणि अल्पसंख्याकांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने चौकशीचे आदेश दिले असून पोलिसांनी सुमारे डझनभर संशयितांना अटक केल्याचा दावा केला आहे. मात्र मानवाधिकार संघटना आणि हिंदू नेत्यांच्या मते ही घटना अपवाद नसून अल्पसंख्याकांवरील वाढत्या हिंसाचाराच्या साखळीतील एक कडी आहे.

सुमारे १७ कोटी लोकसंख्या असलेल्या बांगलादेशमध्ये हिंदू समुदायाची संख्या अंदाजे १.३१ कोटी म्हणजेच सुमारे ८ टक्के आहे, तर मुस्लिम लोकसंख्या ९१ टक्के आहे. बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन युनिटी कौन्सिलच्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२४ मध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यापासून २,००० हून अधिक जातीय हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली आहे. यात किमान ६१ हत्या, महिलांवरील २८ गंभीर गुन्हे ज्यात बलात्कार आणि सामूहिक बलात्कारांचा समावेश आहे तसेच प्रार्थनास्थळांवर ९५ हल्ले झाले आहेत. परिषदेनुसार सरकार अनेकदा या घटनांकडे दुर्लक्ष करते किंवा त्यांचे गांभीर्य कमी करून दाखवते. मात्र सरकार हे आरोप फेटाळून लावत असून बहुतांश घटना धार्मिक प्रेरणेतून झालेल्या नसल्याचा दावा करत आहे.

१२ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. पूर्वीच्या निवडणुकांदरम्यान हिंसाचारात वाढ झाली असून त्याचा फटका प्रामुख्याने धार्मिक अल्पसंख्याकांना बसला आहे. यावेळी शेख हसीनांचा अवामी लीग पक्ष निवडणूक प्रक्रियेबाहेर असल्याने आणि त्या भारतात निर्वासित असल्याने हिंदू समुदाय अधिकच असुरक्षित झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. हिंदूंना हसीनांचे समर्थक मानले जात असल्याने त्यांच्यावर लक्ष्य वाढल्याचे चित्र आहे.

"आता कोणीही स्वतःला सुरक्षित समजत नाही. भीती सर्वत्र पसरली आहे," असे ढाक्यातील मानवाधिकार कार्यकर्ते रंजन कर्माकर सांगतात. गुन्हेगारांना शिक्षा न झाल्यामुळे दंडमुक्तीची संस्कृती बळावत असून ग्रामीण भागात हिंसाचार अस्तित्वाचा प्रश्न बनत चालल्याचे ते म्हणतात.

या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील मोठ्या इस्लामी पक्षांपैकी जमात-ए-इस्लामीच्या राजकीय पुनरागमनाची चर्चा सुरू आहे. शेख हसीनांच्या कार्यकाळात निर्बंधांमुळे बाजूला पडलेला हा पक्ष आगामी निवडणुकांना संधी म्हणून पाहत आहे. हिंदूंवरील हल्ल्यांमुळे भारत-बांगलादेश संबंधांमध्येही तणाव निर्माण झाला आहे. भारत सरकारने या घटना सातत्याने घडणाऱ्या आणि चिंताजनक असल्याचे म्हटले आहे.